# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

## राजगुरुनगर

# विद्यार्थी विकास मंडळ

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान, भाषिक कौशल्यांचा विकास आणि मराठी साहित्य व संस्कृतीबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

या पंधरवड्याअंतर्गत दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी चारोळी लेखन व कथालेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सर्जनशील लेखनकौशल्याचे प्रभावी सादरीकरण केले.

तसेच दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे यांचे "शिवरायांची अष्टक्रांती" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी व्याख्यानातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे विविध पैलू, राष्ट्रनिर्मितीतील योगदान आणि इतिहासाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले. विद्यार्थ्यांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

संपूर्ण मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रमांनी समृद्ध झाला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता, साहित्याची आवड आणि इतिहासाबद्दल अभिमान निर्माण झाला. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या नियोजनाखाली सर्व कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाले.

प्रा. के. डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय


GPS Map Camera
Rajgurunagar, Maharashtra, India
Rvxq+r7g, Rajgurunagar, Maharashtra 410505, India
Lat 18.849651° Long 73.888065°
Saturday, 24/01/2026 09:55 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Rajgurunagar, Maharashtra, India
Rvxq+r7g, Rajgurunagar, Maharashtra 410505, India
Lat 18.849822° Long 73.887865°
Saturday, 24/01/2026 10:01 AM GMT +05:30
Google


साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला
GPS Map Camera
Rajgurunagar, Maharashtra, India
Vv2q+352, Talkhed, Rajgurunagar, Maharashtra 410505, India
Lat 18.850037° Long 73.88827°
Tuesday, 27/01/2026 10:05 AM GMT +05:30
Google